औद्योगिक व अशासकीय संस्थांच्या सहभागातून त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करणेबाबत.
मे.जिंदाल स्टील लि., डोलवी & मे.ए.के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांकः एफएलडी-२०१८/प्र.क्र.२३२/फ-१०

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १४.०५.२०१९

वाचा:-

१. महसूल व वन विभाग, शासन आदेश समक्रमांक दि.१४.११.२०१८

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/१७-४/प्र.क्र.५७/९३/१९-२०, दि.२६.०४.२०१९

प्रस्तावना -

अवनत वन क्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्यासाठी खाजगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्याबाबत त्रिपक्षीय करारनामा करुन वनीकरण हाती घेण्याच्या धोरणास शासनाने दिनांक २३.०९.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

खाजगी संस्था मे.जिंदाल स्टील लि., डोलवी व टेरे पॉलिसी सेंटर, पुणे या अशासकीय संस्थेच्या सहकार्याने मौ.डोलवी, ता.पेण, जि.रायगड येथील स. नं. ४३ /अ /१ मधील २५.०० हेक्टर संरक्षित वनक्षेत्रावर वनीकरण करण्याचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य सचिव, उच्चाधिकार समिती यांनी शासनास सादर केला होता. उच्चाधिकार समितीच्या दि.२३.१०.२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये या प्रस्तावाबाबत चर्चा होऊन समितीने सदर प्रस्तावास मान्यता दिली होती. त्यानुसार दि.१४.११.२०१८ रोजी त्याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.२६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये टेरे पॉलिसी सेंटर, पुणे या अशासकीय संस्थेने वनीकरणाच्या कामास व त्रिपक्षीय करारनामा करण्यास नकार दिल्याचे कळविले आहे. तसेच टेरे पॉलिसी सेंटर, पुणे या संस्थेऐवजी मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे या अशासकीय संस्थेच्या सहाय्याने सदर वनीकरण करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

शासन आदेश-

मे. जिंदाल स्टील लि., डोलवी यांनी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.२६.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये टेरे

पॉलिसी सेंटर, पुणे या अशासकीय संस्थेऐवजी मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे या अशासकीय संस्थेच्या सहाय्याने सदर वनीकरण करण्याच्या प्रस्तावास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुषंगाने शासन आता असे आदेश देत आहे की, महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांकःएफएलडी-२०१८/प्र.क्र.२३२/फ-१०,दि.१४.११.२०१८ अधिक्रमित करण्यात येत आहेत. तसेच खाली नमूद केलेल्या वनक्षेत्रामध्ये मे. जिंदाल स्टील लि., डोलवी ही औद्योगिक संस्था व टेरे पॉलिसी सेंटर, पुणे या अशासकीय संस्थेऐवजी मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे ही अशासकीय संस्था व उपवनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करुन एकूण २५.०० हेक्टर क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्याचा प्रकल्प राबविण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

गाव	सर्व्हे नंबर	वैधानिक दर्जा	एकूण क्षेत्र (हेक्टर)	लागवडीयोग्य क्षेत्र
मौजे डोलवी, ता.पेण, जि.रायगड	४३ /अ १	संरक्षित वन	७४.३३	२५.००
एकूण क्षेत्र				**२५.०० हेक्टर**

२. सदर प्रकल्पास दिलेली मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

i. वरील क्षेत्रात वृक्ष लागवड करणे, जल-मृदसंधारण करणे, ७ वर्षापर्यंत त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे काम मे.जिंदाल स्टील लि., डोलवी यांचे अर्थसहाय्याने मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे यांनी करावे.

ii. प्रकल्पासाठी व त्याच्या व्यवस्थापनासाठी येणारा सर्व खर्च मे. जिंदाल स्टील लि., डोलवी ही औद्योगिक संस्था करेल.

iii. प्रकल्पांतर्गत करण्यात येणारी वृक्ष लागवड ही वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात येईल. वन विभागामार्फत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने यावर्षी १ जुलै ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या वृक्ष लागवड कार्यक्रमात वृक्ष लागवड पूर्ण करण्यात यावी.

iv. प्रकल्पासाठी शासन पत्र क्र.एफएलडी-१०१२/प्र.क्र.२०३/फ-१०, दिनांक ०८/०१/२०१३ अन्वये विहित केलेल्या त्रिपक्षीय करारनाम्याच्या मसुद्याप्रमाणे मे.जिंदाल स्टील लि., डोलवी ही औद्योगिक संस्था, मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे ही अशासकीय संस्था व उपवनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्यात यावा. वन विभागाच्या वतीने त्रिपक्षीय करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यासाठी उपवनसंरक्षक, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

v. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले वन विभागाचे कोणतेही अधिकारी यांना प्रकल्प स्थळी भेट देवून प्रकल्पाचे निरीक्षण करण्याचा व त्याबाबत सुधारणा / सूचना करण्याचा अधिकार राहील.

vi. त्रिपक्षीय करारनाम्यातील कोणत्याही अटीचे मे.जिंदाल स्टील लि., डोलवी ही औद्योगिक संस्था, मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे ही अशासकीय संस्था यांच्याकडून भंग झाल्यास त्रिपक्षीय करारनामा तात्काळ समाप्त करण्याचा अथवा इतर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्याचा अधिकार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना असेल.

vii. ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी औद्योगिक संस्थेच्या खर्चाव्दारे रोपवनास काटेरी तारेचे कुंपण **(Barbed Wire Fencing)** करण्यात यावे.

viii. आवश्यकतेनुसार रोपवनास सिंचनाची व्यवस्था करण्यात यावी.

३. वरील ठिकाणी वृक्ष लागवड करताना, ती केल्यानंतरच्या ७ वर्षाच्या कालावधीत आणि भविष्यात कधीही या वनक्षेत्रावर मे.जिंदाल स्टील लि., डोलवी ही औद्योगिक संस्था, मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, ठाणे ही अशासकीय संस्था यांना कोणताही कायदेशीर व मालकी हक्क प्राप्त होणार नाही आणि त्याबद्दल त्यांना कोणत्याही न्यायालयात वा प्राधिकरणापुढे कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५१४१७११४७३४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.05.14 17:18:17 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर

३) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे

४) उप वनसंरक्षक, अलिबाग

५) मे.जे.एस.डब्ल्यू.स्टील लिमिटेड, मौजे-डोलवी, ता.पेण, जि.रायगड-४०२ १०७.

६) मे. ए. के. रूरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, अमृत आंगण फेज-II, रिलायन्स मार्केट समोर, बिल्डिंग नं. ५, गाळा नं. ६, पारसिक नगर, कळवा, ठाणे (प.)- ४००६०५.

७) टेरे पॉलिसी सेंटर, ३०६, मल्टीकॉन स्क्वेअर, मनोहर मंगल कार्यालयाच्या पुढे, एरंडवणे, पुणे-४११ ००४.

८) निवडनस्ती (फ-१० कार्यासन).